# बृहन्मुंबई महानगरपालिका

## नियोजन विभाग

## जाहिरात

# समुदाय संघटक या पदाची कंत्राटी भरती

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जेंडर बजेटच्या महिला व बालकल्याण योजनांच्या अंमलबजावणीसाठी ११ महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्त्वावर (ठोक मानधनावर) ''समुदाय संघटक'' पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्ज स्वीकारण्याचा पत्ता :** साहाय्यक आयुक्त (नियोजन) यांचे कार्यालय, ५वा मजला, जनता क्लॉथ मार्केट इमारत, हॉकर्स प्लाझा, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई-४०० ०२८.

अर्ज प्रत्यक्ष किंवा टपालाने स्वीकारण्यात येतील.

**अर्ज करण्याची अंतिम तारीख :** २८.०६.२०२२ आहे.

रिक्त पदे भरावयाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | पदांची संख्या | मासिक मानधन | वय | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | समुदाय संघटक | ११३ | रु. २०,०००/- प्रतिमाह | **खुल्या प्रवर्गाकरिता** १८ ते ३८ वर्षे<br>**मागास प्रवर्गाकरिता** १८ ते ४३ वर्षे<br>सुवर्ण जयंती योजना/ दीनदयाळ अन्त्योदय योजना काम केलेल्या उमेदवारांसाठी २ वर्षे शिथिलक्षम. | १. **निम्नतम शैक्षणिक अर्हता :** कोणत्याही शाखेतील पदवी. तथापि, समाजशास्त्र विषयातील पदवी (BA Sociology) अथवा समाजकार्य विषयातील पदवी (BSW) असल्यास प्राधान्य देण्यात येईल.<br>२. सामाजिक क्षेत्रामध्ये स्वयंसेवी संस्थेमध्ये किमान २ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक.<br>३. शासकीय मान्यताप्राप्त संस्थेचे मराठी टंकलेखनाचे प्रति शब्द ३० व इंग्रजी टंकलेखनाचे प्रति शब्द ३० प्रमाणपत्रास प्राधान्य.<br>४. शासनाच्या नियमाप्रमाणे एम.एस.सी.आय.टी. (MSCIT) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक किंवा एम.एस. ऑफिस, पॉवर पॉइन्ट, वर्ड, एक्सेल यांचे ज्ञान आवश्यक. तथापि, संबंधित प्रमाणपत्र अनिवार्य.<br>५. मराठीचे ज्ञान आवश्यक. |

वरील पदांसाठी सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांची संख्या, विहित अर्ज करण्याची पद्धत, शैक्षणिक अर्हता, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया व इतर महत्त्वाच्या सर्व सूचना इ.बाबतच्या सविस्तर तपशिलासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **http://portal.mcgm.gov.in** या संकेतस्थळावरील **उज्ज्वल संधीकरिता येथे क्लिक करावे- माहिती येथे क्लिक करावे- सर्व नोकरीच्या संधी येथे क्लिक करावे- समुदाय संघटक या पदाची भरती** येथे क्लिक करावे. येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे व सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

**सर्वसाधारण सूचना :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **http://portal.mcgm.gov.in** या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात अटी व शर्तींसह प्रसिद्ध करण्यात येत आहे. उमेदवारांनी संकेतस्थळावरील जाहितीला अनुसरून जाहिरातीत नमूद अटी व शर्तींनुसार उपरोक्त नमूद पत्त्यावर आपले अर्ज सादर करावेत. अर्जाचा नमुना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

उमेदवाराने अर्ज सादर करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

**थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा.**

सही/-
**साहाय्यक आयुक्त (नियोजन)**

पीआरओ/५०२/एडीव्ही/२०२२-२३